


# नावीन्यपूर्ण उपक्रमांची यशोगाथा
















प्रकरणात राष्ट्रीय सुरक्षेचा पैलू अंतर्भूत आहे, या मुद्द्याचा पेगॅसस हेरगिरी तंत्रज्ञानाचा वापर केला की नाही, याची माहिती राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणाशी संबंधित माहिती उघड (पान २ वर)

लो. लोकसत्ता
दि. 18/08/2021

## नांदेडमधील दोन गावांत घराघरांवर मुलीच्या नावांच्या पाट्या

# कन्या अभिमानाचा नवा पायंडा

**सुहास सरदेशमुख लोकसत्ता**

**औरंगाबाद :** स्त्री-पुरुष समानता असावी हे खरे, पण ती रुजवायची कशी? नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील दोन गावांत 'माझी कन्या माझा अभिमान' या उपक्रमांतर्गत प्रत्येक घरावर मुलीच्या नावांच्या पाट्या लावण्यात आल्या आहेत.

सर्वसाधारणपणे गावातील घरे आडनावावरून ओळखली जातात. देशमुखाची गढी, पाटलाचा वाडा किंवा अमक्याचं घर अशी ओळख पूर्वी असणारी ओळख आता त्या घरातील मुलीच्या नावाने व्हावी असे प्रयत्न जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर यांनी सुरू केले आणि आता गावात काही बदल दिसू लागल्याचे सांगण्यात येते आहे.

पूर्वी तीन मुलींची आई मुलासाठी हमखास नवसाचा उपवास ठेवत; पण आता हे प्रमाण कमी होत असल्याचे हा उपक्रम डोंगरगावामध्ये घेणारे ग्रामसेवक संतोष बिस्मिल (पान २ वर)

**उपक्रम का?**

करोनाकाळात मुलींचे नाव घरावर लावावे, असे आवाहन करून त्यावर प्रत्येक तालुक्यातील दोन गावांमध्ये काम व्हावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्याची अंमलबजावणी आता होत आहे. याचे परिणाम मानसिक पातळीवर अधिक असतात. ते मोजता येतीलच असे नाही; पण मुलींना आमच्या आयुष्यात किंमत आहे, हा संदेश पालकांनी स्वीकारावा आणि तिला स्वतंत्र निर्णय घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी ही गरज वाटल्याने हा उपक्रम हाती घेतला, असे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर यांनी सांगितले.



लोकमत

आय विटनेस

## बेटी बचाव बेटी पढाव अभियानाला प्रारंभ

नांदेड जिल्हा प्रशासनाकडून मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी बेटी बचाव, बेटी पढाव हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत मुलीचे नाव, घराची शान ही विशेष मोहीम सुरू केली. या मोहिमेचे उद्घाटन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री अशोकराव चव्हाण, जि.प.अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुनील शिंगणे आदी

Hello Nanded
Page No. 1 Feb 16, 2021
Powered by: erelego.com






# गाव तिथे खोडा

⁕ जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत गाव तिथे खोडा हा उपक्रम घेण्यात आला. जनावरांचे लसीकरण करण्यासाठी यापूर्वी जुनी पद्धत वापरली जात होती. त्यामुळे मुक्या जनावरांना त्रास होत होता. यासह उपचार करणाऱ्या डॉक्टरांची तारांबळ उडायची.

⁕ ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक गावात मानव विकास अंतर्गत 9 तालुक्यांमध्ये 81 लक्ष 92 हजार रुपये निधी उपलब्ध करून 545 गावात खोडे उपलब्ध करून देण्यात आले. तसेच जिल्हा परिषद उपकर 2021–2022 व 2022 –23 मध्ये पुन्हा प्रत्येकी 12 लक्ष रुपये तरतूद करुन 141 गावात 687 खोडे बसविण्यात आले आहेत.

⁕ पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये अजूनही 200 गावात खोडे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
लम्पी स्कीन आजाराच्या प्रादुर्भावा दरम्यान तसेच विविध उपचारांसाठी खोडे उपयुक्त ठरत आहेत.





# गाव तिथे स्मशानभूमी



※ ग्रामीण, दुर्गम भागात गावपातळीवर स्मशानभूमी उपलब्ध नसल्यामुळे पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी गंभीर परिस्थिती निर्माण होत असे. काही ठिकाणी खाजगी मालकीच्या जमिनीवर अंत्यसंस्कार करावे लागत. ही बाब लक्षात घेऊन गाव तेथे स्मशानभूमी तयार करण्याचे नियोजन केले.

※ जिल्ह्यात 1310 ग्रामपंचायती आहेत त्यापैकी 1099 ग्रामपंचायतमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध होती. 313 ग्रामपंचायतीमध्ये मात्र स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नाही, हे लक्षात आल्यानं सर्वे नंतर 133 गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागाच उपलब्ध नव्हती हे निदर्शनास आले. 67 गावात गायरान जमिनीवर आणि 65 गावांमध्ये खाजगी जमिनीत ती खरेदी करून स्मशानभूमीची उपलब्धता केली.

※ जमीन संपादन करताना आणि खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी जमीन मालकांशी संवाद करून अडचणी दूर केल्या. जागेची सनद ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आली . तत्कालीन मा. पालकमंत्री यांच्याशी पाठपुरावा करून जिल्हा नियोजन समितीतून 5.50 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आज नांदेड जिल्ह्यात 1231 ग्रामपंचायतीमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध झाली आहे.

※ काही स्मशानभूमींना शेड आणि दहन सांगाडा उपलब्ध करून देणे शिल्लक आहे. यासाठी 17 कोटी 50 लाख रुपयाचा निधीचा मागणी आराखडा तयार करून मंजुरीसाठी प्रस्तावित आहे. अंतिम संस्काराचे ठिकाण स्वच्छ सुंदर असावे, यासाठी वृक्ष लागवड ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



# मुक्या जनावरांना पाणी




* मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. जनावरांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही हे लक्षात आल्यानंतर नांदेड जिल्हा परिषदेने गावातील पशुवैद्यकीय रुग्णालयात पिण्याच्या पाण्याचा हौद निर्मितीचा उपक्रम हाती घेतला.
* यासाठी जिल्हा परिषद उपकरातून 12 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.
* जिल्ह्यातील 103 पशुवैद्य दवाखान्यात पाण्याचे हौद निर्माण केले आहेत.
* लोकसहभागातूनही 10 हौद तयार केले आहेत.
* या हौदाची रंगरंगोटी करण्यात आली.
* दररोज तीन वेळा नियमित पाणी हौदात टाकण्यात येते.
* जल जीवन मिशन अंतर्गत हौदांना नळ जोडणी दिली जाणार आहे.

## प्रतिक्रिया

पूर्वी दवाखान्यात आणल्यानंतर जनावरांना पिण्याचे पाणी मिळत नव्हते. आता हौद झाल्यामुळे जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे.
–चंदू पिंपळे, डोंगरगाव तालुका मुदखेड






# सुनो नेहा

* शाळांना भेटी दिल्या असता मुलांना काही मुलांना नीट ऐकायला येत नाही काहींना व्यवस्थित दिसत नाही अशी निदर्शनास आले. या मुलांची आरोग्य तपासणी होणे आवश्यक वाटले . त्यामुळे सर्व मुलांची स्क्रीनिंग करण्याचे नियोजन आरोग्य आणि शिक्षण विभागामार्फत केले. सर्व मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.
* 3790 अंगणवाडी 2756 शाळांमधील 53 बालकांची अरबीएसके तसेच इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या द्वारे प्राथमिक तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये 3980 बालके तज्ञांकडून तपासणी व निदान करून उपचारासाठी पाठविण्यात आली.
* तपासणी केलेल्या 749 बालकांचा आळशी डोळा (lazy eye) आढळून आला.त्यावर उपचार केला.
* 356 बालकांना शस्त्रक्रिया उपचार देण्यात आले. 25 मुलांना मोतीबिंदू आढळला त्यावर शस्त्रक्रिया केली. 33 मुलांना लो विजन किटस् देऊन त्यांच्या पालकांना उपचाराबाबत नांदेड येथे प्रशिक्षण दिले. 127 जन्मजात हृदयरोग आढळलेल्या बालकांचे शस्त्रक्रियेद्वारे पुनर्वसन केले. जिल्हा परिषद सेस फंडातून या कार्यक्रमासाठी निधी राखीव ठेवण्यात आला.
* सुनो नेहा नावाचे ॲप तयार करून त्याद्वारे हा कार्यक्रम राबविला. या कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे महत्त्वाचे सहकार्य मिळाले.






## माझे गाव सुंदर गाव

- गाव स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, स्वच्छ भारत मिशन आदी उपक्रम लोकसहभागातून गावांमध्ये राबवले जातात.
- विभागीय आयुक्त मा. सुनील केंद्रेकर यांच्या संकल्पनेतून आणि उपायुक्त विकास मा. सुरेश वेदमुथा यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात सुंदर माझे गाव उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.
- या उपक्रमात हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव, भोकर तालुक्यातील नारवट, हाडोळी, नागापूर, खडकी, हादगाव तालुक्यातील साप्ती, पिंपळगाव यासह जिल्ह्यातील अनेक गावांमधून माझा गाव सुंदर गाव उपक्रमाने गावांचा कायापालट झाला.
- साप्ती गावाने संपूर्ण गावाला एकच रंग दिल्याने गावाला एकीचे बळ प्राप्त झाले. हे गाव जिल्ह्यातील गुलाबी गाव म्हणून नावावर उपाय आले आहे.
- हाडोळी येथे प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी सेग्रीकेशन सेंटर.
- जवळगाव येथे कचरा उचलण्यासाठी ई–रिक्षा
- ग्रामपंचायतीची 100% घरपट्टी व नळपट्टी भरणाऱ्यांना हाडोळी येथे चक्कीचे दळण मोफत दिले जाते.



# माझी मुलगी माझा अभिमान






✻ मुलगी म्हणजे परक्याचे धन आणि मुलगा म्हणजेन वंशाचा दिवा ही समाजातील मानसिकता बदलण्यासाठी आणि मुलीला सन्मान देण्यासाठी हा उपक्रम जिल्ह्यात सुरू केला.

✻प्रत्येक घरावर मुलीच्या नावाची किंवा घरातील महिलेच्या नावाची पाटी लावण्यात आली. यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव घेण्यात आला . जिल्ह्यात एकूण 688 गावात 202824 घरांवर मुलीच्या नावाच्या पाट्या लावण्यात आल्या. 155 गावांमध्ये हे काम प्रगतीपथावर आहे .नवीन आकडेवारीनुसार नांदेड जिल्ह्यात लिंग गुणोत्तर हे 1000 पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. यापूर्वी ते 888 होते.

✻ जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार महिला व मुलींबाबत होणाऱ्या घरगुती हिंसाचार व बालविवाहाचे प्रमाण लक्षणीय घटले आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात मुलींचा महिलांचा सहभाग वाढला आहे.

✻ नांदेड जिल्हा परिषदेला भेट दिलेल्या विधिमंडळ पंचायतराज समिती, विमुक्त जाती व भटक्या जमाती समिती, अनुसूचित जाती व जमाती आयोग, राज्यस्तरावरील वेगवेगळ्या बैठका आणि माध्यमातून उपक्रमाचे कौतुक.



# आई बाबाची शाळा

⁕ कोरोना काळात शाळा बंद होत्या.या काळात आई–बाबांची शाळा हा उपक्रम आकारास आला. मुलांना इयत्ता दुसरीच्या अभ्यासक्रमाची ओळख करून देणे त्यांचा अभ्यास घेणे, पालकांचा सहभाग घेणे ,पालकांची टप्प्याटप्प्याने ऑनलाइन मीटिंग घेतली. ऑनलाइन लिंक व त्यांच्या इच्छेनुसार नोंद करण्यात आली . 70 हजार पालकांनी नोंदी केल्या.17000 पालकांचे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण झाले. त्यांचा अभ्यास कसा घ्यायचा या संदर्भात एक मॉडेल पुस्तिका तयार केली. हे वर्ग विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार स्वतःच्याच घरात भरू लागले .

⁕ पहिल्यांदा उपक्रम 16 तालुक्यांतील 32 शाळांमध्ये सुरू करण्यात आला .त्यानंतर याची व्याप्ती वाढवून सर्व जिल्हा परिषदेच्या 2196 शाळा व खाजगी शाळांसाठी चालवण्यात आला. यात 70 हजार पालकांनी सहभाग घेतला . दर आठवड्याच्या सोमवार आणि गुरुवारी पालकांना उपलब्ध असलेल्या सवडीच्या वेळेनुसार कृती समजावून सांगीतल्या. पालकांनी सोमवार ते बुधवार प्रथम भाषा मराठीचा आणि गुरुवारच्या शनिवार गणित विषयाचा मुलांकडून अभ्यास करून घेतला. आई–बाबांच्या शाळा या उपक्रमामुळे प्रथम भाषा मराठी मध्ये 1.76% व गणित विषयात 5.36% संपादणूक वाढ झाली.

⁕ भारत सरकारचा निपुण भारत हा कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविला. इयत्ता पहिली येणाऱ्या मुलांसाठी पहिले पाऊल शाळा पूर्वतयारी अभियान हा उपक्रम घेतला. शाळा पूर्व तयारीसाठी एप्रिल 2022 व जून 2022 मध्ये मेळावे आयोजित करण्यात आले . या दोन मेळाव्यादरम्यान वाडीवस्त्यांवर माता पालकाचे गट तयार करून त्यांना साहित्य पुरविले आणि मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी इयत्ता तिसरीपर्यंत पायाभूत लेखन वाचन व गणितीय कौशल्य प्राप्त करण्याबाबत प्राथमिक पातळीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माता पालक गटातून प्रत्येक वाडी वस्तीवर एक माता गट आणि गटासाठी रचना तयार केली.


अपेक्षित गट 37652 निवडलेले गट 1800




# नांदेड
# ग्रामीण पर्यटन









※ नांदेड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख सर्वसामान्यांना व्हावी. प्रसिद्ध असलेल्या स्थळांव्यतिरिक्त गाव पातळीवरील पर्यटन स्थळे व पर्यटकांना सहज सुलभ संदर्भ उपलब्ध व्हावेत यासाठी नांदेड ग्रामीण पर्यटन या पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली.

प्रारंभी नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांची संदर्भ ग्रंथ यामधून माहिती घेण्यात आली. त्यानंतर गाव पातळीवर शिक्षक, ग्रामसेवक, स्थानिक नागरिक, विषयतज्ञ यांच्या माध्यमातून गाव पातळीवर असलेले पुरातन मंदिर, दर्गाह, विहार तसेच लोककलांची माहिती जमा करण्यात आली.

※ एक स्वतंत्र कार्यशाळा घेऊन याचे लेखन पूर्ण करून नांदेड जिल्ह्यातील 75 स्थळांची सचित्र माहिती असलेले कॉफी टेबल बुक तयार केले . या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.






# वॉर रूम

⁕ कोणतीही संकल्पना तळागाळापर्यंत पोहोचवायची असेल तर त्यासाठी सूत्रबद्ध नियोजन व व्यवस्थित आखणी, उपक्रम दिशा निश्चित करणे आवश्यक असते, असे मत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास मा. राजेशकुमार साहेब यांनी व्यक्त केले.

⁕ उपक्रमांची अंमलबजावणी होताना त्यातील सातत्य टिकून ठेवण्यासाठी वारंवार बैठका, सूचना, पाठपुरावा करणे आणि काम पूर्ण होईपर्यंत त्यावर लक्ष ठेवणे आवश्यक असते. यासाठी जिल्हा परिषदेच्या वॉर रूमची आवश्यकता होती.

⁕ यासाठी जिल्हा नियोजन समिती मधून नाविन्यपूर्ण योजनेत 29 लक्ष 86 हजार रुपयांचा निधीची तरतूद करण्यात आली.

* यात कॉन्फरन्स हॉलचे नूतनीकरण, राऊंड टेबल, खुर्च्या, 85 इंची स्मार्ट टीव्ही, संवादासाठी माईक, लाईट व साऊंडची व्यवस्था केली.

⁕ तसेच जिल्ह्यातील 16 पंचायत समितीमध्ये 32 इंची टीव्ही देण्यात आला आहे.
त्यामुळे संवाद साधण्यासाठी सोयीचे झाले.

⁕ अशा पद्धतीने सर्व यंत्रणांनी सुसज्ज वॉर रूम मध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. वेळोवेळी होणाऱ्या बैठका, youtube लाईव्ह, ईतर संपर्क सत्रासाठी या वॉर रुमचा अत्यंत योग्यतेने वापर करण्यात येत आहे.

⁕ विशेषत: करोना कालावधीमध्ये एकमेकांशी संपर्कात राहणे शक्य नसताना या वॉर रूमच्या माध्यमातून गाव स्तरापर्यंत एकमेकांच्या संपर्कात रहाता आले.

## प्रतिक्रिया

“ केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासन, मा. विभाग आयुक्त कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय यांच्याशी केव्हाही सुसंवाद साधून योजनेचे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वॉर रूमचा अत्यंत उपयोग होत आहे.” – डॉ. संजय तुबाकले, प्रकल्प संचालक– जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड



# शाळेबाहेरची शाळा



※ नियमित शाळेत न येऊ शकणाऱ्या स्थलांतरित पालकांच्या मुलांना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी नांदेड परिसरातील वीटभट्टयांच्या ठिकाणी वाजेगाव परिसरात शाळेबाहेरची शाळा सुरू करण्यात आली आहे.

※ प्रचलित शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळा विचार मांडणारी ही शाळा एक मॉडेल म्हणून विकसित केले आहे . 21 व्या शतकातील शैक्षणिक कौशल्य विकास कृती व जीवनानुभवातून शिक्षण दिले जात आहे.

※ स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात आली आहे. बदलाव हम लायेंगे हे ब्रीद निर्धारित करून एक नोव्हेंबर 2022 पासून प्रत्यक्ष शाळा सुरू झाली आहे. जिल्ह्यात ३७६ विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची सोय करण्यात आली आहे.



# मियावाकी घनदाट वृक्ष लागवड




* मियावाकी या जपानी पद्धतीमध्ये अतिशय कमी जागेत जास्तीत झाडांची शाश्वत वाढ केली जाते. या जंगल निर्मितीमध्ये स्थानिक वृक्षांना स्थान दिले आहे.
* जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, मैदान असलेल्या जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायती तसेच पंचायत समिती येथे वृक्ष लागवडी करण्यात आली.
* जिल्ह्यातील 68 प्राथमिक आरोग्य केंद्र, 47 शाळा, 10 पशुवैद्यकीय दवाखाने, 6 पंचायत समित्या, 10 ग्रामपंचायतीसह 288 प्लॉटमध्ये 35,000 वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे.
* तसेच 44,000 महोगणी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.





# एकाच दिवशी जलपूजन





* डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या अंतर्गत जिल्ह्यात 15 नोव्हेंबर 2022 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना,बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अनुसूचित जाती जमाती या प्रगती लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात आली.

लाभार्थ्यांना नवीन विहीर, वीज जोडणी विद्युत पंप संच, तुषार संच ,ठिबक संच या स्वरूपात रुपये 3,30,000पर्यंत लाभ देण्यात येतो.

* 2021 –22 मध्ये 2950.53 लक्ष निधी होता. 60 लक्ष खर्च झाला आहे. 624 लक्ष रुपयांची कामे सुरू आहेत .

* बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत अजून 2021– 22 मध्ये प्राप्त निधी 350 लक्ष आहे. तांत्रिक मान्यता 457.50 लक्ष आणि खर्च 54.35 पेक्षा झाला आहे. रु. 1,67 हजाराची कामे सुरू आहेत.

* बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना 2021 –22 मध्ये प्राप्त निधी 100 लक्ष आणि 77.50 लक्षास तांत्रिक मान्यता आणि खर्च 10.64 लक्ष झाला आहे.

रोजगारासाठी स्थलांतरित होण्याचे प्रमाण कमी झाले.






# पिंपळशेंडा

※ किनवट तालुक्यातील पिंपळशेंडा हे गाव. कर्नाटक आणि तेलंगणाच्या सिमांना जवळीकता साधणार हे गाव. या गावाला सुविधेचा मार्ग नसल्याने 8 किमी अंतरावर असलेल्या  मांडवी बाजारपेठेला जाण्यासाठी तब्बल 25 किमीचा फेरा पूर्ण करून जावे लागत होते.

※ तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर व मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी या गावाला प्रत्यक्ष भेट देऊन पर्यायी मार्गाबाबत सर्व संबंधित विभागांना सोबत घेतले. यात वन विभागाच्या परवानगीपासून  शेजारी तेलंगणा राज्याच्या जिल्हा प्रशासनासह समन्वय साधत विक्रमी वेळेत हा मार्गाच्या सर्व परवानग्या हस्तगत केल्या.

※ जिल्हा प्रशासनाच्या सोईच्या दृष्टिने किनवट येथे सर्व प्रशासकीय कार्यालय देण्यात आली आहेत. जवळची बाजारपेठ असलेल्या मांडवी गावात  केवळ सोईचा रस्ता नसल्याने  25 किमी अंतराचा फेरा पिंपळशेंडा गावासह इतर वाड्या–पाड्यातील लोकांना पडायचा. आता या नवीन मार्गामुळे मोठा दिलासा येथील लोकांना मिळाला आहे.

※ हा मार्ग मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत घेतला आहे. रस्ते विकास योजना 2020–21 अंतर्गत या रस्त्याचा क्रमांक हा ग्रामीण मार्ग 21 असा योगा–योगाने आला आहे. सुमारे 8 किमी लांबीचा हा रस्ता सिमेंट काँक्रिटचा रस्ता असून याची रुंदी 3.30 मीटर एवढी धावपट्टीची रुंदी आहे. या कामासाठी 4 कोटी 69 लाख रुपये एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्राम विकास विभागाचे मा. अप्पर मुख्य सचिव यांचे मार्गदर्शन आणि या कामाला त्यांनी  दिलेल्या मंजुरी मुळेच  स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पिंपळशेंडा येथील रस्ता आपण पूर्ण करू शकलो. याचा आनंदही ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळतो.

## प्रतिक्रिया

"रस्ता नसल्यामुळे आजारी माणसाला शहरात जाता येत नव्हते मुलांचं लग्न होताना सुद्धा इतर गावचे लोक मुलगी या गावात देताना विचार करत होते आता आमच्या गावाला रस्ता मंजूर झालेला आहे त्यामुळे आता रस्त्यांची सोय होईल. गावातील शेती उत्पादनाचा माल गाडीने बाहेर नेता येत नव्हता. आता शेतमाल नेण्याची सुविधा होईल. विशेष म्हणजे मुलांना शाळा कॉलेजला जाण्याची सुविधा मिळणार आहे."



# गोष्टीचा शनिवार

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी आणि विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टी निर्माण व्हावी यासाठी शाळांचे ग्रंथालये समृद्ध करण्यात आली आहेत . नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आणि लोकसहभागातून शाळा ग्रंथालयांची उभारणी करण्यात आली आहे .ज्या शाळा डिजिटल आहेत अशा शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी विकसित करण्यात आली आहे .जिल्ह्यात 2196 जि.प. प्राथमिक शाळांमधून दर शनिवारी एक तास वाचनाचा उपक्रम घेतला जातो .विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. विद्यार्थी पुस्तके वाचतात आणि त्यावर आपले मनोगत लिहितात .पुस्तकांविषयी बोलतात.

गोष्टीचा शनिवार

इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत भाषा साक्षरता संदर्भाने विद्यार्थ्यांचे मराठी भाषा वाचन कौशल्य विकसित व्हावे आणि त्यांच्यामध्ये वाचन अभिरुची निर्माण व्हावी यासाठी गोष्टींचा शनिवार` हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत दर आठवड्याला शनिवारी विद्यार्थी गटनिहाय मराठी भाषेतील गोष्टींची डिजिटल पुस्तक लिंक देण्यात येते. संबंधित इयत्तेच्या शिक्षकांना या लिंक द्वारे ऑनलाइन डिजिटल /पीडीएफ स्वरूपात पुस्तक वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात. तसेच वर्गामध्ये सहभागींचे वाचन घेतले जाते. वाचन झाल्यानंतर त्या वाचनावर आधारित असलेली कृती त्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांकडून पूर्ण होईल असे पाहिले जाते.



# ग्रामिण आरोग्य सुविधा

* नांदेड जिल्ह्यात एकूण 68 प्राथमिक आरोग्य केंद्र व 379 आरोग्य उपकेंद्र आहेत.
* ग्रामीण भागात रुग्णाला आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचवणे सुलभ व्हावे ही गरज लक्षात घेऊन कोव्हीड काळातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी प्राप्त निधीतून नांदेड जिल्ह्यात 102 क्रमांकाच्या 67 ॲम्बुलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे.
* कोविड काळात आमदार निधीतून 11, आदिवासी उपयोजनेतुन 3, राज्य शासनाकडून 5, आणि आपत्ती व्यवस्थापनाकडून 47 अशा एकूण 67 रुग्णवाहिका माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी उपलब्ध केल्या आहेत.
* ग्रामीण भागात एक्स–रे सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना खर्चाचा भुर्दंड व आरोग्याची समस्या वाढू शकते.
* ही बाब लक्षात घेऊन प्रायोगिक तत्वावर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरे मशीन व सी आर पी प्रणाली बसवण्यात आली आहे, त्यामुळे नागरिकांची धावपळ थांबली आहे.






# शिक्षण संवादी शाळा भेटीचा नाविन्यपूर्ण उपक्रम

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेच्यावतीने गुणवत्ता विकासासाठी शिक्षण संवादी हा उपक्रम 17 नोव्हेंबर 2022 पासून सुरु करण्यात आला आहे. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , शिक्षणाधिकारी प्राथमिक, शिक्षणाधिकारी माध्यमिक, शिक्षणाधिकारी योजना, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक , गटशिक्षणाधिकारी यांचे एकूण 8 गुणवत्ता नियंत्रण पथके तयार करण्यात आलेली आहेत . पथकाचे प्रमुख व त्यांचे सदस्य दर गुरुवारी सकाळी 7 वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासस्थानी उपस्थित राहतात .त्या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी या स्वत: तालुक्याच्या व शाळांच्या नावाच्या डब्यामधून चिठ्ठ्या काढतात. चिठ्ठ्या काढलेल्या दोन शाळांना शिक्षण संवादी भरारी पथक भेट देते. परिपाठास उपस्थित राहून शाळा सुटेपर्यंत पथक शाळेत उपस्थित राहते. व भौतिक सुविधा गुणवत्तेची तपासणी करून त्याच दिवशी सायंकाळी जिल्हा कक्षामध्ये अहवाल सादर करतात.

भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शाळा भेटीचा तपशील विभागाकडे सादर केला जातो. शिक्षण संवादी पथक अहवालाचे आधारे उणिवा आढळल्यास खुलासे घेतले जातात. सुधारणा सुचविल्या जातात. उत्कृष्टांना अभिनंदन पत्र दिले जातात.

शिक्षण संवादी पथकाने आतापर्यंत 108 शाळांना भेटी दिल्या आहेत .त्यावेळी विद्यार्थी उपस्थिती 55 ते 65 टक्के च्या दरम्यान दिसून आली. 24 नोव्हेंबर 2022 रोजी भरारी पथकाने 18 शाळांना भेटी दिल्या. त्यामध्ये उपस्थितीत 65 ते 80 टक्के च्या दरम्यान दिसून आली. तसेच विविध गुणवत्ता विषयक बाबींची शाळा स्तरावरील अंमलबजावणी सुधारताना दिसत आहे.




# प्रकाशने

पोस्टर्स, फोल्डर्स, हस्तपुस्तिका, कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून जिल्हा परिषद सर्वदूर पोहोचू शकली. जिल्हा परिषदेच्या विविध योजना आणि त्याची अंमलबजावणी या संदर्भाने विस्तृत माहिती देणाऱ्या या पुस्तिका लाभार्थ्यांसाठी महत्वाचे योगदान ठरल्या. कृषी, शिक्षण, आरोग्य, महिला आणि बालकल्याण, पशुसंवर्धन, समाज कल्याण, डीआरडीए मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची जंत्री लोकांना या पुस्तकांमुळे मिळू शकली.

प्रकाशनासह सर्व योजनांची व्यापक प्रसिद्धी करून लोकांचा प्रतिसाद पाहण्यासाठी माध्यम कक्ष निर्माण करण्यात आला. माध्यम कक्षाच्या मार्फत प्रचार, प्रसिद्धी आणि प्रकाशने या संदर्भाने मोठ्या प्रमाणावर काम करण्यात आले आहे.

निर्मिती : माध्यम कक्ष, जिल्हा परिषद नांदेड